Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# -: परिपत्रक :-

संदर्भ - लेखा विभागाचे दि. 25/08/2023 चे परिपत्रक.

विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक व प्रशासकीय विभागप्रमुख यांना कळविणेत येते की, उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये GST बाबत सविस्तर तपशीलासह आपणास यापूर्वी कळविण्यात आले आहे. त्यामध्ये GST लागू असलेल्या ज्या वस्तू व सेवांच्या माध्यमातून रक्कम जमा करून घ्यावयाची आहे त्याची जबाबदारी संबंधीत विभाग/अधिविभागांची आहे, त्यानुसार संबंधीत पुरवठादार/ठेकेदार/फर्म इ. यांना बिल (Sales Invoice) हे संबंधीत विभाग/अधिविभाग यांनी उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आले आहे. तथापि बहुतांशी विभाग/अधिविभागांकडून बिल (Sales Invoice) उपलब्ध करून देण्यात येत नाही त्यामुळे GST ताळमेळबाबत अडचणी उद्भवत आहेत.

उपरोक्त बाबींचा विचार होवून ज्या वस्तू व सेवांच्या माध्यमातून रक्कम जमा करून घ्यावयाची आहे त्या संबंधीत पुरवठादार/ठेकेदार/फर्म इ. ना बिल (Sales Invoice) उपलब्ध करून देण्याची सुविधा वित्त विभागाच्या जमा व स्विकृती विभागामध्ये (रूम नं. 107) करण्यात आली आहे. बिल प्राप्त झालेनंतर संबंधीतांनी तात्काळ रक्कम विद्यापीठामध्ये Online स्वरूपामध्ये जमा करावी. GST Invoice issue केल्यानंतर रक्कम जमा करणेबाबत विभाग/अधिविभाग यांनी पाठपुरावा करणेचा आहे. **अपवादात्मक परिस्थितीत GST Invoice issue केल्यानंतर त्या महिन्याच्या 30 तारखेपर्यंत रक्कम जमा करून घेण्याची दक्षता घ्यावी.**

यापुढे विभाग/अधिविभागांकडील बिल (Sales Invoice) तयार करण्याची सुविधा बंद करण्यात आली आहे. उपरोक्त बाबींची काटेकोर अंमलबजावणी व्हावी. अन्य बाबींची कार्यवाही यापूर्वीच्या परिपत्रकानुसार राहील याची नोंद घ्यावी.

याबाबत काही अडचण उद्भवल्यास/जादा माहितीची आवश्यकता भासल्यास प्रशासकीय इमारत रूम नं 103 मध्ये माहिती उपलब्ध करून दिली जाईल.

Spatil
वित्त व लेखा अधिकारी

जा.क्र./एसयु/लेखा विभाग/ 50

दि. 27 FEB 2024